**समक्ष अध्यक्ष, मोटार अपघात प्रकरणे न्यायाधिकरण, वर्धा**
**एम.ए.सी.पी (एम.ए.एन.आर.जे.आय.) क. २३/२०२६**
**विशाल राजु कोडापे –वि.– निरंक**
**नि. क. १ वर आदेश पारित**
**दिनांक १८/०४/२०२६**

मोटार अपघात दावा प्रकरण क. १७/२०१३ दिनांक १६/०९/२०१७ रोजी निकाली काढण्यात आले. त्यानुसार गैरअर्जदार यांनी न्यायालयात रक्कम जमा केली होती. त्यापैकी दिनांक २३.०१.२०१८ चे आदेशानुसार मुळ प्रकरणातील अर्जदार क. ३ विशाल राजु कोडापे यांना रककम रु. **१,००,०००/– (अक्षरी रूपये एक लाख फक्त)** देण्याबाबत आदेशीत करण्यात आले होते. तसेच ती रक्कम अर्जदार क. ३ विशाल राजु कोडापे सज्ञान होईपावेतो त्यांचे नावे मुदतठेव पावतीमधे ठेवण्याबाबत आदेशीत करण्यात आले होते. ती रक्कम मिळण्याकरीता मुळ प्रकरणातील अर्जदार क. ३ विशाल राजु कोडापे यांनी अर्ज केला आहे.

सदर प्रकरणात मुळ प्रकरणातील अर्जदार क. ३ विशाल राजु कोडापे यांनी दाखल केलेल्या त्यांच्या आधारकार्ड नुसार त्यांची जन्मतारीख २१/०६/२००६ आहे यावरुन आज रोजी तो १८ वर्षाचा झाल्याचे दिसुन येते.

उपरोक्त मोटार अपघात प्रकरणामधे अर्जदार क. ३ विशाल राजु कोडापे यांचे नावे रक्कम **रु. १,००,०००/– (अक्षरी रूपये एक लाख फक्त)** इंडियन ओव्हरसीज बॅक शाखा वर्धा येथे जमा असुन त्याचा एफ.डी.आर. खाता क. २९४००४००००००८०८ दिनांक १४/०२/२०१८ असुन त्याची मुदत दिनांक १४/०२/२०२६ रोजी संपली असल्याबाबतचा अहवाल वरिष्ठ लिपीक(मोटार अपघात), रोख व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, वर्धा यांनी दिलेला आहे.

प्रकरणांतील निकालाचे आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयात अपील झालेले नाही अथवा स्थगनादेश नाही असा अहवाल संबंधित लिपीक यांनी दिलेला आहे. मुळ अभिलेखाची पडताळणी केली असता अर्जदाराने प्रकरणांत आवश्यक असलेली संपूर्ण कोर्ट फी भरल्याचे दिसुन येते. वरील मुदत ठेव पावतीची परिपक्वता झालेली आहे. त्यामुळे अर्जदार क. ३ चा अर्ज मंजुर करता येईल.

करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

**आदेश**

मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. ३ **विशाल राजु कोडापे** यांना एफ.डी.आर. खाता क्र. २९४००४०००००००८०८ मधे जमा असलेली रक्कम **रु. १,००,०००/– (अक्षरी रूपये एक लाख फक्त)** एवढी व्याजासह त्यांचे ओळखीवर प्रदान करण्यांत यावी.

स्वा/-

दिनांक: १८/०४/२०२६

( हेमंत भ. गायकवाड)
अध्यक्ष,
मोटार अपघात प्रकरण न्यायाधिकरण,वर्धा